दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
E-paper : https://epaper.hinduprakashwarta.com Web portal : https://hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

पाहिजेत
श्री VARAD CONSTRUCTION
सिव्हिल इंजिनिअर, डिझाईन व स्ट्रक्चर पाहिजे
shrivaradconstructionco@gmail.com

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## मुंबई इंडियन्ससमोर गुजरातच सरेंडर, नरेंद्र मोदी स्टेडिअमवर MI ने इतिहास घडवला

**अहमदाबाद |** अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिमअवर आज मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सचा 99 धावांनी पराभव केला आहे. विशेष म्हणजे मुंबईने पहिल्यांदाच गुजरात टायटन्सला त्यांच्या होमग्राऊंडवर हरवलं आहे. मुंबई इंडियन्सने प्रथम फलंदाजी करताना 199 धावा ठोकल्या होत्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरात टायटन्स 100 धावांवर ऑल आऊट झाली होती. त्यामुळे मुंबई इंडियन्सने हा सामना 99 धावांनी जिंकला होता.

मुंबई इंडियन्सने दिलेल्या 199 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सची सूरूवात खूप खराब झाली होती. कारण साई सुदर्शन शुन्यावर बाद झाला होता. त्याच्यानंतर जोस बटलर 5 धावांवर बाद झाला. त्यानंतर शुभमन गिल डाव सावरेल असे वाटत होते, पण तो देखील 14 वर बाद झाला. त्याच्यानंतर वॉशिंग्टन सुंदर 26 वर बाद झाला होता.

वॉशिंग्टन सुंदर बाद झाल्यानंतर मॅच जवळ जवळ गुजरात टायटन्सच्या हातून निसलटी होती. त्यानंतर ग्लेन फिलिप्स 6 वर बाद झाला होता. फिलिप्स गेल्यानंतर राहुल तेवतिया मैदानात आला, पण तो देखील 8 वर बाद झाला. त्याच्यानंतर शाहरुख 17 आणि राशीद खान 4 बाद झाला होता. त्यानंतर कगिसो रबाडा 12 आणि मोहम्मद सिराज शुन्यावर बाद झाला.अशाप्रकारे गुजरात 100 वर ऑलआऊट झाली. त्यामुळे मुंबईने हा सामना 99 धावांनी जिंकला. तिलक वर्माच्या या 101 धावांच्या नाबाद शतकीय आणि नमन धीरच्या 45 धावांच्या बळावर मुंबई इंडियन्सने 5 विकेट गमावून 199 धावा केल्या होत्या.

दरम्यान मुंबईने हा सामना जिंकून मोठा इतिहास घडवला आहे. कारण गुजरातच्या टीमने जेव्हापासून आयपीएल खेळायला सूरूवात केली होती. तेव्हापासून मुंबई इंडियन्सला एकदाही नरेंद्र मोदी स्टेडिअमवर सामना जिंकता आला नव्हता. पण मुंबई इंडियन्सने आज हा जूना इतिहास पुसला आहे.

## राज्य शासनाकडून ९ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या



**मुंबई |** महाराष्ट्र राज्य गृह विभागाने सोमवारी राज्यातील 9 वरिष्ठ भारतीय पोलीस सेवा (IPS) अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये पुणे, सातारा, कोल्हापूर आणि सांगलीसह अनेक जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांचा समावेश आहे. पुण्याचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांची सातारा जिल्हा पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे शहरात कार्यरत असलेले पोलीस उपायुक्त (DCP) निखिल पिंगळे आता साताऱ्याची धुरा सांभाळतील. तर पुण्याचे दुसरे उपायुक्त राजकुमार शिंदे यांची बदली वाशिमच्या पोलीस अधीक्षकपदी करण्यात आली आहे. दुसरीकडे, जळगावचे पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांची पुण्याच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागात (CID) पोलीस अधीक्षक म्हणून बदली झाली आहे.

साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांची सांगलीच्या पोलीस अधीक्षकपदी बदली झाली असून, सांगलीचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांची मुंबईत राज्य गुप्तवार्ता विभागात पोलीस उपायुक्त (सुरक्षा) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल आता कोल्हापूरचे नवे पोलीस अधीक्षक असतील. कोल्हापूरचे विद्यमान अधीक्षक योगेश गुप्ता यांची पदोन्नतीवर गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक (DIG) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

पुण्याचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांची सातारा पोलीस अधीक्षकपदी, तर साताऱ्याचे अधीक्षक तुषार दोशी यांची सांगलीच्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल आता कोल्हापूरचे नवे पोलीस अधीक्षक असतील, तर जळगावचे अधीक्षक महेश्वर रेड्डी यांची पुण्याच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागात (CID) पोलीस अधीक्षक म्हणून बदली झाली आहे.सांगलीचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांची मुंबईतील राज्य गुप्तवार्ता विभागात पोलीस उपायुक्तपदी वर्णी लागली आहे. धुळ्याचे अधीक्षक श्रीकांत धिवरे आता जळगावचे पोलीस अधीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळतील. तसेच, पुण्याचे पोलीस उपायुक्त राजकु मार शिंदे यांची वाशिमच्या पोलीस अधीक्षकपदी बदली करण्यात आली आहे. गडचिरोलीचे अपर पोलीस अधीक्षक एम. रमेश यांना त्याच जिल्ह्यात पदोन्नतीने पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्त केले आहे, तर कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक योगेश गुप्ता यांची गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे.

सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांची वादग्रस्त कारकीर्द

सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून तुषार दोषी यांची कारकीर्दी अतिशय वादग्रस्त राहिली. नुकत्याच सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीत थेट पालकमंत्री शंभूराज देसाई यांनाच धक्काबुक्की झाली. त्यावेळी देसाई यांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांच्यावर कारवाईची मागणी केली. अगदी विधिमंडळातून दोषी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. पुढे ही कारवाई मागे घेण्यात आली. तसेच फलटण येथील एका मुलीच्या आत्महत्या प्रकरणात देखील जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांच्या कार्यपद्धतीवर अनेकांनी आक्षेप नोंदवले.

## शेतजमिनीच्या वाटणीवरील नोंदणी फी रद्द



**मुंबई |** राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा देत राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाकडून आज जारी करण्यात आले आहे. आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह, आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ददेवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे. शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. या कलमांतर्गत वाटणीपत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. परंतु, अनेक नागरिक तहसीलदारांकडे न जाता थेट दुय्यम निबंधक कार्यालयात आपसातील संमतीने वाटणीपत्र नोंदणीसाठी सादर करत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्यालयांकडून नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

शेतकऱ्यांचा होणारा हा गोंधळ दूर करण्यासाठी शासनाचे महत्वाचे पाऊल उचलले असून महसूल विभागाने आता याबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. नवीन स्पष्टीकरणानुसार कलम ८५ अंतर्गत तहसीलदार स्तरावरून होणाऱ्या वाटणीपत्रांच्या नोंदणीसाठी कोणतेही शुल्क लागणार नाही. वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत वारसा हक्क प्राप्त झालेल्या सर्व सहधारकांनी एकत्र येऊन थेट नोंदणी कार्यालयात सादर केलेल्या वाटणीपत्रालाही आता नोंदणी शुल्कातून सूट मिळेल. एकाच कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या शेतजमिनीच्या वाटप दस्तावरही कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. या निर्णयामुळे शेतजमिनीच्या वाटणीसाठी होणारा खर्च वाचणार असून प्रलंबित वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

## पर्यटन विकासासाठी नवीन प्लॅन

**छत्रपती संभाजीनगर |** शहरातील पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा स्थळांच्या जतनासाठी आज दुपारी जिल्हा प्रशासनाने एक नवीन मास्टर प्लॅन जाहीर केला आहे. दुपारी २:१५ वाजता झालेल्या पत्रकार परिषदेत, पर्यटकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्मार्ट पर्यटन प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. यामध्ये अजिंठा-वेरूळ लेणी परिसरात ई-बस सेवा सुरू करणे, ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरातील स्वच्छता आणि सुरक्षा वाढवणे यावर भर देण्यात आला आहे. केंद्र सरकारकडून यासाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे पर्यटनातून मिळणाऱ्या महसुलात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी पर्यटनाशी संबंधित कौशल्य विकास केंद्रे देखील सुरू केली जाणार आहेत.

## अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का ; दिल्ली उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली



**नवी दिल्ली |** दारू धोरण प्रकरणात न्यायमूर्ती स्वराणा कांता शर्मा यांनी स्वतःला या प्रकरणातून दूर ठेवावे, ही याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फफेटाळल्याने अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का बसला आहे. उत्पादन शुल्क धोरण प्रकरणाच्या सुनावणीतून न्यायमूर्ती स्वराणा कांता शर्मा यांनी स्वतःला दूर ठेवावे, अशी विनंती करणारी अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि इतरांनी दाखल केलेली याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली.

न्यायालयाने निकाल दिला की, पक्षपाताच्या आरोपांना कोणताही तथ्यात्मक आधार नाही आणि त्यांना कोणतेही कायदेशीर वजन नाही.

न्यायालयाने पुढे नमूद केले की, असे आरोप म्हणजे मूलतः न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा मलीन करण्याचा प्रयत्न आहे आणि त्यामुळे, न्यायमूर्तींनी स्वतःला या प्रकरणातून दूर ठेवण्याचे समर्थन होऊ शकत नाही.

याचिका फफेटाळताना, न्यायालयाने यावर जोर दिला की, न्यायव्यवस्थेचे कामकाज निराधार चिंता किंवा संशयांमुळे प्रभावित होता कामा नये.एका ठाम आणि सविस्तर आदेशात, न्यायमूर्ती शर्मा यांनी नमूद केले की, न्यायाधीशांना खटल्यातून दूर करण्यासाठी केलेले अर्ज कोणत्याही ठोस पुराव्याऐवजी केवळ सूचक विधाने आणि निराधार आरोपांवर आधारित होते. त्यांनी असा निकाल दिला की, अर्जदारांची वैयक्तिक भीती आणि संशय हे खटल्यातून दूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या कायदेशीर मर्यादेपेक्षा कमी होते. अशा अस्पष्ट दाव्यांना मान्यता दिल्यास एक धोकादायक पायंडा पडेल, असा इशारा न्यायाधीशांनी दिला.

न्यायमूर्ती शर्मा यांनी या याचिकेचे वर्णन 'कॅच-22' (पेचप्रसंग) परिस्थिती निर्माण करणारी असे केले; जर न्यायालयाने खटल्यातून स्वतःला दूर केले, तर ते आरोपांना वैधता देत आहे असे वाटेल; आणि जर न्यायालयाने नकार दिला, तर निकालावर नंतरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकते. न्यायालयाने असे मत मांडले की, अशा डावपेचांना परवानगी दिली जाऊ शकत नाही, कारण त्यामुळे वैयक्तिक न्यायाधीशाचा अधिकार आणि संस्थेची विश्वासार्हता या दोन्हींना धक्का लागण्याचा धोका असतो. न्यायालयाने असा इशारा दिला की, अशा दबावाला बळी पडल्यास अशा प्रकरणांचा पूर येऊ शकतो, ज्यामुळे सार्वजनिक मोहिमा किंवा सततच्या आरोपांद्वारे न्यायालयीन निर्णयांमध्ये फफेरफफार केली जाऊ शकते, अशी धारणा निर्माण होईल.

न्यायव्यवस्थेच्या कर्तव्याची पुन:पुष्टी करताना, न्यायालयाने नमूद केले की, जेव्हा खरोखरच हितसंबंधांचा संघर्ष अस्तित्वात होता, तेव्हा न्यायालयाने भूतकाळात स्वतःहून खटल्यातून स्वतःला दूर केले आहे किंवा प्रकरणे हस्तांतरित केली आहेत. तथापि, न्यायालयाने स्पष्ट केले की केवळ निराधार शंका किंवा माध्यमांच्या टीकेच्या आधारावर न्यायिक कार्ये सोडून देता येणार नाहीत.

'या न्यायालयाचा झगा इतका हलका नाही,' असे न्यायमूर्ती शर्मा यांनी नमूद केले आणि पुढे म्हटले की, न्यायालय केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर न्यायपालिकेसारख्या व्यापक संस्थेसाठीही ठामपणे उभे राहील.शेवटी, न्यायालयाने न्यायाधीशांना खटल्यातून दूर करण्याच्या अर्जात काहीही तथ्य नसल्याचे ठरवून तो फफेटाळून लावला. अशा विनंत्या मान्य करणे म्हणजे न्यायाधीशांवरील निराधार आरोपांना कायदेशीर वैधता प्रदान करण्यासारखे ठरेल आणि याचा अंतिम परिणाम म्हणून, निष्पक्षपणे न्याय दिला जाण्याऐवजी 'न्यायाचे व्यवस्थापन' केले जाण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकेल, असा इशारा न्यायालयाने दिला.

हे प्रकरण 'दिल्ली उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२' शी संबंधित आहे; ज्यामध्ये 'सीबीआय'ने अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि इतरांची या प्रकरणातून केलेली मुक्तता उच्च न्यायालयात आव्हानित केली आहे. माघारीची विनंती आता फफेटाळण्यात आल्यामुळे, उच्च न्यायालय आता या प्रकरणाची सुनावणी त्याच्या गुणवत्तेच्या आधारे) पुढे चालवेल.

## महापालिकेचे दहा स्विकृत नगरसेवक जाहीर

**छत्रपती संभाजीनगर |** नगरसेवकांच्या तौलनिक संख्येनुसार महापालिकेने दहा स्विकृत सदस्यांसाठी अर्ज मागविले होते. त्यानंतर अर्जांची छाननी झाली. आज मनपाच्या सर्वसाधारण सभेत महापौर समीर राजूरकर यांनी गटनेत्यांकडून प्राप्त झालेली नावे जाहीर केली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी प्रदीप उर्फ हनुमान दिनकरराव शिंदे यांच्यासह दहा स्विकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली. महापालिकेचे ११५ नगरसेवक निवडणूक आले आहेत. या नगरसेवकांच्या तौलनिक संख्येनुसार व राजकीय पक्षाच्या निवडून आलेल्या सदस्य संख्येनुसार दहा सदस्य हे स्विकृत म्हणून घेता येतात. भाजप-५, एमआयएम-३, शिवसेना-१ आणि शिंदेगट-१ या प्रमाणे कोटा निश्चित करण्यात आला. त्याप्रमाणे नगर सचिव विभागाने स्विकृत सदस्यांसाठी इच्छूकांकडून अर्ज मागविले होते. ८० इच्छूकांचे अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जाची छाननी केली असता ५२ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. त्यानंतर गटनेत्यांकडून नावे मागविण्यात आली. गटनेत्यांनी बंद लिफाफ्यात स्विकृत सदस्यासाठी नावे दिली. आज सोमवारी घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेत महापौर समीर राजूरकर यांनी दहा स्विकृत सदस्यांची नावे जाहीर केली. या दहा स्विकृत नगरसेवकांची राजपत्रात नावे प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर त्यांना सभागृहात प्रवेश दिला जाणार आहे.

हे दहा नगरसेवक

त्यामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी प्रदीप उर्फ हनुमान शिंदे, भाजपचे हर्षवर्धन कराड, छाया खाजेकर, गोकुलसिंग मलके, विजयसिंग झाला, अमृता पालोदकर, शिंदे गटाचे शुभम काळे आणि एमआयएमचे कुणाल खरात, शेख अहेमद शेख इलियास, मोहम्मद असरार मोहम्मद अकबर या दहा स्विकृत नगरसेवकांची निवड झाली.

## उमर खालिदची पुनर्विलोकन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली



**नवी दिल्ली |** दिल्ली दंगलीच्या मोठ्या कटाच्या प्रकरणात जामीन नाकारल्याच्या निर्णयाला आव्हान देणारी उमर खालिदची पुनर्विलोकन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठाने ती याचिका फेटाळून लावली, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ५ जानेवारीच्या निकालाला आव्हान देण्यात आले होते, ज्याद्वारे न्यायालयाने खालिदचा जामीन नाकारला होता.

'पुनर्विचार याचिकेवरील तोंडी सुनावणीची विनंती फेटाळण्यात येत आहे. विलंब क्षमापनास पात्र. पुनर्विचार याचिका आणि त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर, आम्हाला दिनांक ०५.०१.२०२६ च्या निर्णयाचा पुनर्विचार करण्यासाठी कोणतेही योग्य कारण आढळत नाही. त्यानुसार, पुनर्विचार याचिका फफेटाळण्यात येत आहे,' असे १६ एप्रिल रोजी पारित केलेल्या आदेशात म्हटले आहे.

तत्कालीन प्रस्तावित नागरिकत्व सुधारणा कायद्यावरून (सीएए) झालेल्या संघर्षानंतर फेब्रुवारी २०२० मध्ये दिल्ली दंगल उसळली. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, या दंगलीत ५३ जणांचा मृत्यू झाला आणि शेकडो जण जखमी झाले.प्रस्तुत प्रकरण हे खालिद आणि इतरांनी अनेक दंगली घडवण्याचा कट रचल्याच्या आरोपांशी संबंधित आहे. सप्टेंबर २०२० मध्ये खालिदला अटक करण्यात आली आणि त्याच्यावर गुन्हेगारी कट, दंगल, बेकायदेशीर जमाव तसेच बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा अंतर्गत इतर अनेक गुन्ह्यांचा आरोप ठेवण्यात आला.

तो तेव्हापासून तुरुंगात आहे. या वर्षी जानेवारीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने खालिद आणि शरजील इमाम यांचा जामीन नाकारला होता , तर गुलफफिशा फफातिमा, मीरान हैदर, शिफा उर रहमान, शादाब अहमद आणि मोहम्मद सलीम खान या 5 इतर आरोपींना जामीन मंजूर केला होता.न्यायालयाने असा युक्तिवाद केला होता की, इतर आरोपींच्या तुलनेत खालिद आणि इमाम हे गुणात्मकदृष्ट्या वेगळ्या स्तरावर होते. रेकॉर्डवरील पुराव्यांवरून खालिद आणि इमाम यांच्याविरुद्ध प्रथमदर्शनी गुन्हा सिद्ध होतो, असे न्यायालयाने पुढे म्हटले.'या न्यायालयाची खात्री पटली आहे की, फफिर्यादी पक्षाच्या पुराव्यांमधून अपीलकर्ते उमर खालिद आणि शरजील इमाम यांच्याविरुद्ध प्रथमदर्शनी आरोप उघड झाला आहे. या अपीलकर्त्यांच्या बाबतीत वैधानिक निकष लागू होतो.

कार्यवाहीचा हा टप्पा त्यांना जामिनावर सोडण्याचे समर्थन करत नाही,' असा निष्कर्ष न्यायालयाने त्यावेळी काढला होता. तथापि, न्यायालयाने असेही म्हटले आहे की, संरक्षित साक्षीदारांची तपासणी पूर्ण झाल्यावर किंवा सद्य आदेशापासून एक वर्ष पूर्ण झाल्यावर खालिद आणि इमाम पुन्हा जामिनासाठी अर्ज करू शकतात.त्यानंतर खालिदने या आदेशाचा फेरविचार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## शेअर बाजारात दाणादाण; गुंतवणूकदारांचे एका दिवसात १९ हजार कोटींचे नुकसान

दिल्ली,२० एप्रिल : अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता चर्चे च्या दुसऱ्या फेरीच्या पार्श्वभूमीवर, देशांतर्गत शेअर बाजारात दिवसभर सतत चढ-उतार दिसून आले. व्यवहारांची सुरुवात वाढीने झाली. बाजार उघडल्यानंतर तेजीवाले आणि मंदीवाले यांच्यात रस्सीखेच सुरू झाली, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये चढ-उतार झाले. दिवसअखेरीस, सेन्सेक्स ०.०३ टक्क्यांच्या आणि निफ्टी ०.०५ टक्क्यांच्या किरकोळ वाढीसह बंद झाला.

ऑटोमोबाइल आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकिंग क्षेत्रातील शेअर्समध्ये स्थिर खरेदी सुरू राहिली. त्याचप्रमाणे, भांडवली वस्तू, टिकाऊ ग्राहक वस्तू, तेल आणि वायू, आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम निर्देशांकही वाढीसह बंद झाले. दरम्यान, आयटी, रिअल्टी आणि टेलिकॉम शेअर्सवर विक्रीचा दबाव कायम होता. त्याचप्रमाणे, एफएमसीजी, आरोग्यसेवा, धातू आणि तंत्रज्ञान निर्देशांकही घसरणीसह बंद झाले. आज व्यापक बाजारात विक्रीचा दबाव कायम राहिल्याने, निफ्टी मिडकॅप निर्देशांकात सामान्य घसरण झाली आणि तो ०.१८ टक्क्यांनी खाली बंद झाला. त्याचप्रमाणे, स्मॉलकॅप निर्देशांक ०.४५ टक्क्यांनी खाली येऊन बंद झाला. आज शेअर बाजारात माफक वाढ होऊनही, मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समधील विक्रीमुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत अंदाजे २०,००० कोटी रुपयांची घट झाली. आजच्या व्यवहारानंतर बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४६५.४५ लाख कोटी रुपयांपर्यंत (तात्पुरते) घसरले. गेल्या आठवड्यातील शेवटचा व्यवहार दिवस असलेल्या शुक्रवारी, त्यांचे बाजार भांडवल ४६५.६४ लाख कोटी रुपये होते. परिणामी, आजच्या व्यवहारात गुंतवणूकदारांना अंदाजे १९ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले.

## आ. विलास बापू भुमरे यांच्याकडून दै. हिंदू प्रकाशवार्ताच्या प्रकाशनास शुभेच्छा



हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर |** रविवार दि. १९ एप्रिल रोजी बीड बायपास रोडवरील एमआयटी महाविद्यालयासमोरील आयोजित रॉन्देव्हज हॉटेलमध्ये पार पडलेल्या दैनिक हिंदू प्रकाश वार्ताच्या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी पैठणचे शिवसेना आमदार विलास बापू भुमरे यांनी उपस्थित राहून संपादक व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी दैनिक हिंदू प्रकाश वार्ताचे कार्यकारी संपादक विकास पाटील आणि उपसंपादक प्रफुल्ल पाटील यांना आ. विलास भुमरे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पैठणचे माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, सभापती तथा उपजिल्हाप्रमुख विनोद बोंबले, राजेंद्र दादा तांबे यांचीही उपस्थिती होती.

## दीर्घकालीन वेदना व्यवस्थापन आणि निरोगी जीवन प्रतिबंधात्मक फिजिओथेरपीची भूमिका : डॉ. प्राजक्ता नायर

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर |** शहरातील उस्मानपुरा येथील इंदु सुपर स्पेशालिटी फिजिओथेरपी अँड हीलिंग सेंटरमध्ये 'दीर्घकालीन वेदना व्यवस्थापन आणि निरोगी जीवन' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. प्राजक्ता नायर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात अनेक रुग्ण सहभागी झाले होते. सर्वांना भेडसावणारी एक मोठी आरोग्य समस्या म्हणजे दीर्घकालीन वेदना आणि जीवनशैलीशी संबंधित स्नायू व हाडांचे विकार, याकडे लोकांचे लक्ष वेधणे हा या व्याख्यानाचा मुख्य उद्देश होता.

आजच्या वेगवान युगात आपण गॅजेट्स, फॅशन आणि भौतिक सुखसोयींवर मोठा खर्च करतो, मात्र आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. जोपर्यंत वेदना असह्य होत नाहीत आणि हालचाल गंभीरपणे मर्यादित होत नाही, तोपर्यंत लोक प्रतिबंधात्मक उपचारांकडे फिरकत नाहीत. याचा परिणाम म्हणून बरे होण्याची प्रक्रिया अधिक खर्चिक आणि वेळखाऊ बनते. दीर्घकालीन मानदुखी, पाठदुखी, सांध्यांचा ताठरपणा आणि तणावामुळे स्नायूंमध्ये येणारा ताण हे विकार



**फिजिओथेरपी हा केवळ दुखापत किंवा हालचाल थांबल्यानंतरचा एक उपचार पर्याय नाही. हा एक विज्ञान-आधारित, प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक दृष्टिकोन आहे जो व्यक्तींना खालील गोष्टींमध्ये मदत करतो :**
*** शरीराची योग्य ठेवण आणि हालचाल टिकवून ठेवणे**
*** जीवनशैलीशी संबंधित वेदना आणि सांध्यांची झीज रोखणे**
*** तणावामुळे निर्माण होणारा स्नायूंचा ताण नियंत्रित करणे**
*** ताकद, लवचिकता आणि सहनशक्ती सुधारणे**
*** औषधांवर अवलंबून न राहता जीवनाचा दर्जा उंचावणे**
*** वेदना आणि दुखापतीतून सुरक्षितपणे आणि प्रभावीपणे बरे होणे**

आता फक्त वृद्धांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर तरुण, व्यावसायिक, विद्यार्थी आणि लहान मुलांमध्येही हे प्रमाण वाढले आहे. तासनतास स्क्रीनसमोर बसणे, चुकीची बसण्याची पद्धत आणि व्यायामाचा अभाव ही या समस्यांची प्रमुख कारणे आहेत.

जेव्हा हालचाल करणे कठीण होते, तेव्हाच अनेक लोक फिजिओथेरपिस्टकडे जातात, मात्र तोपर्यंत उशीर झालेला असतो. तज्ज्ञांचा सल्ला, शरीराच्या स्थितीबद्दल मार्गदर्शन, एर्गोनॉमिक्स आणि तणाव व्यवस्थापन हे सुरुवातीलाच अंगीकारल्यास भविष्यातील मोठे त्रास टाळता येतात. वेदना तुम्हाला थांबवण्याची वाट पाहू नका, तर निरोगी आयुष्यासाठी प्रतिबंधात्मक काळजी घ्या, असा मोलाचा संदेश डॉ. प्राजक्ता नायर यांनी दिला. बैठे काम करणाऱ्या किंवा उच्च तणावात राहणाऱ्या व्यक्तींनी नियमित तपासणी केल्यास सुरुवातीची लक्षणे ओळखून दीर्घकालीन आजार रोखता येतात. निरोगी जीवनशैली आणि फिजिओथेरपीच्या योग्य मदतीने आरोग्याला प्राधान्य देणे आजच्या काळाची गरज आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## परतवाडा प्रकरणी नेत्यांचा कलगीतुरा!

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील एका संवेदनशील प्रकरणावरून नवनीत राणा, प्यारे खान आणि विजय वडेट्टीवार यांच्यात सुरू झालेला वाद सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रस्थानी आहे. हा वाद केवळ एका घटनेपुरता मर्यादित न राहता, त्याला आता जातीय, धार्मिक आणि राजकीय परिमाण लाभले आहेत. अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार आणि त्यांचे व्हिडिओ व्हायरल झाल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणी नवनीत राणा यांनी 'लव्ह जिहाद'चा रंग दिल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. एका मुलाने आमच्या मुलींवर अत्याचार करत त्याचे १५० हून अधिक व्हिडिओ काढले आहेत. हे व्हिडिओ सर्व सोशल मिडीयावर व्हायरल केले. त्यामध्ये एकही व्हिडिओ बुरख्यावाल्याचा नाही त्या आमच्या मुली आहेत, असे माजी खासदार नवनीत राणा यांनी म्हटले आहे. या प्रकरणात हिंदू मुलींना जाळ्यात ओढले जात असल्याचा दावा माजी खासदार नवनीत राणा यांनी केला होता. या प्रकरणावरून नवनीत राणा, अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यात सध्या मोठा राजकीय वाद सुरू आहे. नवनीत राणा यांनी या प्रकरणात प्यारे खान यांच्यावर गंभीर आरोप केले. प्यारे खान हे या प्रकरणातील आरोपींना पाठीशी घालत असल्याचा दावा त्यांनी केला. नवनीत राणा यांनी प्यारे खान यांनी हिंदू समाजाची माफी मागावी आणि आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी लावून धरली. दरम्यान हा वाद सुरू असतानाच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची एन्ट्री आणि राणा यांना उद्देशून विषवल्ली असा शब्दप्रयोग करून विखारी टीका केली. नवनीत राणा म्हणजे जातीय विष पसरवण्यासाठी पोसलेली आणि पाणी घालून जिवंत ठेवलेली विषवल्ली आहे, असे विधान त्यांनी नागपुरात केले. जात आणि धर्मामध्ये भांडण लावून आपली राजकीय पोळी कशी भाजता येईल, हेच त्या पाहत असतात,' असा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केला. महिलांवरील शोषणात जात-धर्म येतोच कुठे? जो कुणी नराधम असेल त्याला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, असेही ते म्हणाले. त्यांनी नवनीत राणा आणि अनिल बोंडे यांच्यावर दोन समाजांत तेढ निर्माण केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची मागणीही केली. वडेट्टीवारांच्या टीकेला उत्तर देताना नवनीत राणा यांनी देखील आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी वडेट्टीवारांचा उल्लेख 'चिल्लर लोक' असा केला. काँग्रेसनेच हिरवे विषारी साप पोसून ठेवले आहेत, म्हणून ते आता वळवळ करत आहेत,' असा पलटवार त्यांनी केला. भाजपचे नेते तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या सर्व नेत्यांना संवेदनशील विषयावर बोलताना संयम राखण्याचा आणि बेजबाबदार वक्तव्ये न करण्याचा सल्ला दिला आहे. प्यारे खान म्हणाले की, नवनीत राणा यांनी पीडित अल्पवयीन मुलींची माहिती सार्वजनिक केली आहे. कायद्यानुसार पीडितांची ओळख उघड करणे हा गंभीर गुन्हा असून, त्याअंतर्गत राणा यांच्यावर कारवाई व्हावी. या प्रकरणात १८० हिंदू मुलींचे शोषण झाल्याच्या अफवा पसरवून दंगा भडकवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा दावा प्यारे खान यांनी केला आहे. प्रत्यक्षात या सर्व आठ पीडित मुली मुस्लीम समाजाच्या असून त्यातील चार परतवाडा, तीन अमरावती आणि एक नागपूर येथील आहे. प्यारे खान म्हणाले की, अमरावती अत्याचार प्रकरणी अफवा पसरवणारी व्यक्ती कोणत्याही पक्षामध्ये काम करत असो किंवा कितीही मोठी असो त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे आम्ही पोलिसांना सांगितले आहे. या प्रकरणातील एक आरोपी होता तो आरोपीला रुम मिळवून देत होता. दोन मुलींवर अत्याचार झाला तर ६ मुलांसोबत केवळ फोटो आहेत. एकही मुलगी त्यांची नाही सर्व आमच्या मुली आहेत.प्यारे खान म्हणाले की, एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी महिलांसाठी बिल आणत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महिला सशक्त व्हाव्या म्हणून काम करत आहेत. दुसरीकडे तुम्ही महिलांना उद्ध्वस्त करत आहात. पीडितेची माहिती सार्वजनिक केल्याबद्दल त्यांच्यावर पोक्सोनुसार गुन्हा दाखल झाला पाहिजे.




विनायक मेटे - अजित दादा पवार या दोन नेत्यांची दोस्ती नेहमी चर्चेचा विषय ठरायची. दुर्दैवाने दोन्ही मराठा नेत्यांचा संशयास्पद अपघाती मृत्यू झाला. मराठा समाज पोरका झाला. मात्र या दोन्ही नेत्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नींनी समाजकार्याची ही धुरा आपल्या अंगावर घेतली. हे शिवधनुष्य पेलणं सोपं नव्हतं, आणि नियती बघा सुनेत्रा पवार यांच्या बारामती विधानसभा पोट निवडणुकीच्या निमित्ताने पवार-मेटे ही जोडी पुन्हा मंचावर दिसली.

सुनेत्रा पवार आणि ज्योती मेटे यांच्या रुपाने, मराठा समाजाला नवं नेतृत्व मिळालं आहे. अठरापगड जाती आणि बारा बलुतेदारांना न्याय देणारा मराठा समाज स्वत: मागास राहिला मात्र महाराष्ट्र धर्मासाठी लढला. या समाजालाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अजितदादा आणि विनायकराव मेटे यांनी आजन्म प्रयत्न केले. आज त्यांच्या नंतर हा संघर्षाचा वारसा सुनेत्रा वहिनी आणि ज्योती वहिनी चालवत आहेत. पती गमावल्याचं दुःख तळघरात कोंडून या दोन्ही महिला नेत्या घराबाहेर पडल्या, बारामतीत एका मंचावर आल्या. महाराष्ट्रात एका नव्या राजकीय पर्वाची ही चाहूल आहे.

# 'आरक्षणाचे तुकडे की संपूर्ण हक्क? : आजच्या पिढीने विचार करण्याची वेळ'




**आज आपण एका अत्यंत गंभीर आणि संवेदनशील टप्प्यावर उभे आहोत. अनुसूचित जाती ( SC ) समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर 'अ, ब, क, ड' असे वर्गीकरण करण्याचा मुद्दा पुढे येत आहे. हा विषय केवळ प्रशासनिक बदल नाही, तर आपल्या सामाजिक न्यायाच्या लढ्याशी निगडित आहे. म्हणूनच या विषयाकडे भावनिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून पाहणे अत्यंत गरजेचे आहे.**

### आरक्षणाचा इतिहास आणि त्यामागील संघर्ष

भारतातील आरक्षण व्यवस्था ही कुठल्याही दयेची किंवा कृपेची देणगी नाही. ती हजारो वर्षांच्या सामाजिक अन्यायाविरुद्धच्या संघर्षातून मिळालेली ऐतिहासिक विजयाची निशाणी आहे.महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान समाजसुधारकांनी शिक्षण, समानता आणि न्याय यासाठी आयुष्य वेचले. त्यांच्या 100 वर्षांहून अधिक काळ चाललेल्या संघर्षातूनच SC, ST आणि OBC समाजाला शिक्षण, नोकरी आणि पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा अधिकार मिळाला.ही केवळ धोरणात्मक तरतूद नाही, तर संविधानिक हक्क आहे जो सामाजिक समतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

### 'अ, ब, क, ड' वर्गीकरण : न्याय की विभाजन?

आज 'SC' समाजात वर्गीकरण करण्याचा प्रस्ताव पुढे येतो आहे. वरवर पाहता हा प्रस्ताव 'समाजातील सर्व घटकांपर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचावा' या उद्देशाने मांडला जातो. पण प्रश्न असा आहे हा निर्णय खरोखर सर्वांना न्याय देईल का? की हा एक हळूहळू आरक्षण कमकुवत करण्याचा डाव आहे? आजची वस्तुस्थिती पाहिली तर, SC साठी असलेले 13 % आरक्षण पूर्णपणे भरले जात नाही. अनेक शासकीय विभागांमध्ये अनुशेष (backlog) कायम आहे. अनेक पदे रिक्त आहेत.मग प्रश्न असा उभा राहतो जिथे पूर्ण आरक्षणही दिले जात नाही, तिथे वर्गीकरण करून न्याय मिळेल का?

### अनुशेष आणि रिक्त पदांची वास्तवता

गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय नोकऱ्यांमध्ये SC कोट्यातील पदे भरली जात नाहीत.अनेक विभागांमध्ये हजारो पदे रिक्त आहेत. 'योग्य उमेदवार नाही' या कारणावरून जागा खुल्या वर्गाला दिल्या जातात अनुशेष भरला जात नाही भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबवली जाते ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे.आरक्षण दिले आहे, पण त्याची अंमलबजावणी नाही हक्क आहे, पण त्याचा उपयोग नाही. अशा वेळी वर्गीकरणाचा मुद्दा पुढे येतो, जो मूळ प्रश्नांपासून लक्ष विचलित करतो.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No. MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

विशेष लेख
रामदास वच्छलामाई रखमाजी वाघमारे
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त )
छत्रपती संभाजीनगर, मो. 8888125610

### कॉन्ट्रॅक्ट पद्धती : आरक्षणावरचा मोठा धोका

आज सरकारी नोकऱ्यांमध्ये कायमस्वरूपी भरती कमी होत आहे आणि कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने भरती वाढत आहे.ही पद्धत अत्यंत धोकादायक आहे कारण कॉन्ट्रॅक्ट भरतीत आरक्षण लागू होत नाही.

### नोकरीची शाश्वती नाही : पदोन्नतीची संधी नाही

सामाजिक सुरक्षा नाही म्हणजेच, आरक्षणाचा मूळ उद्देशच नष्ट होतो आहे.जर हीच पद्धत वाढत राहिली, तर भविष्यात आरक्षण केवळ कागदावर उरेल.

### पुढाऱ्यांची भूमिका : प्रश्न विचारण्याची वेळ

आज समाजात अनेक समाजाचे पुढारी आरक्षणाच्या नावावर राजकारण करत आहेत. आपल्या समाजातील आपल्याच तरुण बांधवांना गुमराह करत आहेत ही बाब योग्य नाही आज तरुण शिकलेला आहे तो वाचतो आहे तो लिहितो आहे बाबासाहेबांचे विचार घेऊन पुढे जात आहे. बाबासाहेब म्हणाले होते 'वाचाल तर वाचाल' पण वास्तव काय आहे? अनेक पुढारी वाचन न करता तुकडे पाडण्याची भाषा करत आहेत ही बाब योग्य की अयोग्य? वेळीच ओळखायला हवे. आपल्यातील अनेक मोठे झालेल्या पुढाऱ्यांना आरक्षणाची गरज उरलेली दिसत नाही. पण आजही ग्रामीण भागामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांना कोणत्या परिस्थितीमधून जावे लागते हे याच तरुणांना माहीत.मग प्रश्न असा आहे नेतेमंडळी ते कोणासाठी लढत आहेत? सामान्य गरीब मुलांसाठी की स्वतःच्या स्वार्थासाठी? आज झोपडीत राहणारा विद्यार्थी, पालावर राहणारा मुलगा, ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुलगा याला खऱ्या अर्थाने आरक्षणाची गरज आहे.

त्याच्या शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि भविष्याकरिता आरक्षण हेच एकमेव साधन आहे. जर हेच आरक्षण विभागले गेले तर काय परिस्थिती निर्माण होईल याचा विचार करा. SC ला एकूण 13 % आरक्षण आहे. यामध्ये एकूण 59 जाती आहेत. यामध्ये, बौद्ध लोकसंख्या 60 % आहे. मांग लोकसंख्या 19 % आहे. चांभार लोकसंख्या 10 % आहे जवळपास. SC मध्ये सगळ्यात मोठा वाटा फक्त या 3 जातीचा आहे.जवळपास 92 % बाकी 57 जाती फारच लहान आहेत. 0.5 %, 0.2 % अशी लोकसंख्या आहे. त्यामुळे त्या जाती कुठेच दिसत देखील नाहीत. ना शिक्षण ना शासकीय सेवेत. कारण शिक्षणाचा अभाव. बाबासाहेब म्हणाले होते की ' शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' यासाठी त्यांनी म्हटले होते तुम्ही शिकलात तर तुमचा फायदा होईल.

### तुकडे पडल्यास काय होऊ शकते ?

लोकसंख्या नुसार SC च्या 13 % आरक्षण मधून मांग जातीला - 2.6 % आरक्षण मिळेल.आता यात अजून वाटे पडतील अनेक जाती पोटजातीत विखुरल्या जातील वादविवाद होतील आणि भविष्यात तुकडे तुकडे पडतील परत एका छताखाली येतील का नाही हे सांगता येणार नाही. जर अ, ब, क, ड नुसार विभाजन झाले तर ज्या समाजात शिक्षणास कुणीही पात्र नसल्यास ती जागा त्या आरक्षणाचा फायदा ओपन कॅटेगिरीतील व्यक्तीला होईल हे तुम्हाला समजायला हवे.आज खऱ्या अर्थाने तरुण मंडळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन 59 जाती मधील तरुण-तरुणी 13 % मध्ये आपले भविष्य आजमावत आहेत. जर अजून यामध्ये तुकडे पडले तर काय परिस्थिती उद्भवेल याचा विचार करायला हवा.

### आजच्या पिढीची जबाबदारी

आजची पिढी ही सर्वात महत्त्वाची आहे. आपण अंधपणे कोणाचाही पाठलाग करू नये कोणत्याही पुढाऱ्याच्या भावनिक भाषणांना बळी पडू नये प्रत्येक गोष्टीचा तर्कशुद्ध विचार करावा. आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा:,आपल्याला संपूर्ण 13 % आरक्षण हवे आहे का?की त्याचे तुकडे करून कमी प्रभावी आरक्षण स्वीकारायचे आहे?

### शिक्षण हाच खरा बदलाचा मार्ग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.'आजही हेच तत्व लागू आहे.शिक्षण हेच आपले सर्वात मोठे शस्त्र आहे जागरूकता हीच आपली ताकद आहे एकता हीच आपली ओळख आहे.जर आपण विभाजित झालो, तर आपली ताकद कमी होईल.

### एकता की विघटन?

'अ, ब, क, ड' वर्गीकरणामुळे समाजात विभागणी होण्याची शक्यता आहे.एकाच समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण होऊ शकतो. एकजूट कमी होईल. सामूहिक ताकद कमजोर होईल.इतिहास सांगतो विभाजन हे नेहमीच शोषक शक्तींना फायद्याचे ठरते.

कवी संदेश कर्डक म्हणतात की, मुठीतलं हिंदुत्व अण्णा सुटता सुटना, अन अबकड आमचंच आम्हांला कळना , तू सांगितलं होतंस ना घाव घालून जग बदलायला, आमचंच अण्णा अजून दैववादाचं साखळदंड तुटना,बाबासाहेब नावाच्या आभाळाखाली वावरताना, जातीच्या छत्र्या आमच्या अजून काही फाटना, महार मांग एकाचं नाण्याच्या दोन बाजू कळता कळना, एकाचं ताटातल्या भाकरीसाठी भाऊ भावाला वळखना, मनुच्या जात्यात फसला मांग त्याच त्यालाच समजना , गुलामीच्या चिखलात बसला ऐरावत, बाहेर पडता पडना...!

### पुढील दिशा : काय करावे?

आज आपण काही ठोस भूमिका घ्यायला हव्यात,अनुशेष भरावा यासाठी संविधानिक मार्गाने कायद्याच्या चौकटीतून आंदोलन करणे, रिक्त पदे तात्काळ भरली जावीत यासाठी दबाव निर्माण करणे,कॉन्ट्रॅक्ट पद्धतीला विरोध करणे आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करणे. समाजात एकता राखणे या बाबीवर लक्ष केंद्रित असायला हवे.

### 2001 ते 2011 च्या जनगणनेनुसार:

- 2001 च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येत 67 % हिंदू, 32.9 % बौद्ध व 0.1 % (5,983) शीख होते. तर 2011 च्या जनगणनेनुसार, अनुसूचित जातींमध्ये 60.7 % (सुमारे 80.12 लाख) हिंदू, 39.2 % (52,04,284) बौद्ध व 0.1 % (13 हजार) शीख आहेत. 2001-11 या कालावधीत महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या बौद्ध लोकसंख्येत तब्बल 60 % वाढ झाली आहे.
- 2001 मध्ये, महार समुदायाच्या लोकसंख्येत 56.3 % बौद्ध, 43.7 % हिंदू आणि अवघे 0.1 % शीख होते. तर 2011 मध्ये, राज्यात सुमारे 76 लाख महार समाज आहे, महारांत सुमारे 62 % (47.12 लाख) बौद्ध, 37.9 % (28.73 लाख) हिंदू, तर अवघे 0.1 % (7.8 हजार) महार हे शीख धर्मीय आहेत.
- 2011 मध्ये, अनुसूचित जातींच्या लोकसंख्येत 76 लाख महार, 26.8 लाख मांग, 16.5 लाख चांभार व 2.5 लाख भंगी या समाजाचे लोक आहेत. अनुसूचित जातीत या चार जातींचे एकत्रित प्रमाण 92 % आहे.
- अनुसूचित जातीमध्ये बौद्ध धर्म अतिशय वेगाने वाढत आहे. इ.स. 2001 मध्ये भारत देशात 41.59 लाख बौद्ध हे अनुसूचित जातीचे होते, तर इ.स. 2011 मध्ये हे प्रमाण 38 % वेगाने वाढून 57.56 लाख एवढे झाले आहे. देशातील एकूण अनुसूचित जातीच्या बौद्धांपैकी 52.04 लाख (90 % पेक्षा अधिक) महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात एकूण बौद्ध लोकसंख्येत 79.68 % अनुसूचित जाती आहे.

### महाराष्ट्रातील अनुसूचित जाती ( एकूण 59 जाती ):

अगेर,अनमुक,आरेमाला,आरवा माला,बहना, बहाना,बाकड, बांट,बलाही, बलाई,बसोर, बुरुड, बांसोर , बांसोडी , बसोड,बेडा जंगम, बडगा जंगम, बेडर,भांबी, भांभी, असादरू, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित समगार, सतनामी, सूरज्यबंशी, सुरज्यरामनाम, समगारा चर्मकार, परदेशी चामार,भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, कोरार, झाडगल्ली, हेला,बिंदला,ब्यागारा,चलवादी, चत्रया,चेत्रदासर, होलय दासर, होलेया दसारी,डक्कल, डोक्कलवार,ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर, डोम, डुमार, येल्लमलवार, येल्लमलवंडलु, गंडा ,गंडी, गरोड, गारी,घासी, घासीया,हल्लीर, हलसार, हसलार, हुलसवार, हलसवार,होलार, व्हलार, होलय, होलेर, होलेया, होलिया, कैकाडी,कटिया, पथरिया, खंगार, कनेरा, मिरधा,खाटिक, चिकवा,चिकवी, कोलूपूल-वंडलु,कोरी,लिंगडेर,मादगी,मादिगा, महार, मेहर, तराळ, धेगू-मेगू,माह्यावंशी, धेड, वणकर, मारू-वणकर, माला, माला दासरी,माला हन्नाई,माला जंगम,माला मस्ती, माला साले, नेटकानी,माला सन्यासी,मांग, मातंग, मिनीमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग,मांग-गारोडी, मांग-गारुडी, मत्रे,मस्ती, मेंघवाल, मेंघवार,मिठा,अयलवार,मक्री,नाडीया, हादी, पासी, सांसी,शेणवा, चेणवा, सेडमा, रावत,सिंधोल्लू, चिंदोल्लू, तिरगार, तिरबंदा,तुरी अशा 59 जाती बाबासाहेबांचे विचार पुढे घेऊन जात आहेत व एका छताखाली आहेत हीच तर खरी पोटदुखी आहे.

### आजचा प्रश्न अत्यंत स्पष्ट आहे

आपल्याला पूर्ण हक्क हवा आहे का तुकड्यांमध्ये वाटलेला अधिकार? आपल्याला एकजूट हवी आहे का विभाजन? आपल्याला न्याय हवा आहे का दिखावा? आजचा निर्णय आपल्या पुढील पिढ्यांचे भविष्य ठरवणार आहे. झोपडीत शिकणाऱ्या त्या मुलाचा विचार करा, त्याच्या स्वप्नांचा विचार करा, त्याच्या संघर्षाचा विचार करा, आरक्षण हे त्याच्यासाठी जीवनरेखा आहे.चला, आपण सर्व मिळून विचार करूया ... तर्कशुद्ध निर्णय घेऊया...आणि आपल्या हक्कांसाठी एकजुटीने उभे राहूया...

**जय भीम! जय संविधान!**

# कुंडली.....

## :लघु कथा:

राजकारणाच्या आखाड्यात दोनदा उतरलो, दोन्ही वेळा विजयाने हुलकावणी दिली.एकदा नियतीने 'दैवी चिठ्ठी' च्या रूपाने घात केला,तर दुसऱ्या वेळी माझ्याच काही अविचाराने घात झाला. आजच्या काळात 'राजकारण' आणि 'स्वार्थ' ही एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या आहेत, हे सर्वसामान्य माणसाने गृहीत धरलंय; आणि त्यात त्याची तरी काय चूक? सध्याची परिस्थितीच इतकी गढूळ आहे की,तत्त्वांची भाषा आता बाळबोध वाटू लागली आहे. पण मला मात्र तो 'स्वार्थ' कधी साधता आलाच नाही.माझं आयुष्य म्हणजे 'घरच्या भाकरी खायच्या आणि मामाच्या बकऱ्या चारायच्या' असंच राहिलं.

माझी ही अवस्था पाहून माझ्या काही हितचिंतक मित्रांचा जीव तीळ-तीळ तुटत होता.ते म्हणायचे, 'एक तर या राजकारणातून स्वतःचं उखळ पांढरं करून घे, नाहीतर हा नाद सोडून दे.' मी दोन्ही प्रयत्न केले, पण ना मला स्वार्थी होता आलं, ना हा जनसेवेचा छंद सोडता आला.

शेवटी, माझ्या या अवस्थेवर इलाज म्हणून मित्रांनी एक 'युक्ती' लढवली. वरती घाटावर एका दुर्गम खेड्यात एक निवृत्त शिक्षक आहेत, जे कुंडलीवरून भविष्य सांगतात अशी त्यांची ख्याती. योगायोगाने मित्राच्या गाडीतून तिथे जाण्याचा बेत ठरला. दोन तासांचा नागमोडी प्रवास संपवून आम्ही दुपारी एकच्या सुमारास त्या गावात पोहोचलो.गावाच्या नावापुढे 'आदर्श गाव' ही पाटी होती,पण गावाचं रूप मात्र जुनं,घरं आमच्या घरासारखीच धाब्याची आणि माढीची होती. मास्तरांची प्रसिद्धी इतकी की घर शोधायला कोणाला विचारावं लागलं नाही.

घराबाहेर चपलांचा जो प्रचंड ढीग पडला होता,तो पाहून काळजात धस्स झालं.मनात आलं, 'बाप रे! या जगात दुःखी आणि त्रस्त लोकांची संख्या किती अफाट आहे.' तरीही, संघशिस्तीचे संस्कार पुसले गेले नव्हते; मी माझी चप्पल व्यवस्थित कोपऱ्यात जोडून ठेवली आणि आत पाऊल टाकलं.

आतलं दृश्य म्हणजे जणू एक 'दुःखाचा दरबार' भरला होता. मास्तर एका फिरत्या खुर्चीवर बसले होते आणि समोर त्यांच्याच वयाचा एक जुनापुराणा कॉम्प्युटर होता.मी कोपऱ्यात बसून लोकांचे चेहरे वाचू लागलो.कुणी महिला पतीच्या भविष्यासाठी व्याकुळ होती,तर कुणी तरुण रोजगारासाठी डोळ्यात आशा घेऊन बसला होता.एक माणूस तर चक्क महिनाभराचं बाळ 'ठेवू की नको' हे विचारायला आला होता,कारण मागच्या वेळी मास्तरांनी मुलाचा योग सांगितला होता.दुसरीकडे, एक आई आपल्या अल्पवयीन मुलीच्या वागण्याने हताश होऊन रडत होती; मास्तरांनी तिच्या पत्रिकेतला 'मंगळ' कडक असल्याचे सांगून तिला अधिक सावध राहायला बजावलं.




ते दृश्य पाहून मला तो एखादा 'मल्टीस्पेशालिटी दवाखाना' वाटू लागला,जिथे शरीराचे नाही तर नशिबाचे उपचार चालतात.

माझा नंबर आला तेव्हा मी गप्पच होतो.मित्रांनीच माझी 'राजकीय व्याधी' मांडली आणि मास्तरांनी त्यावर काही उपाय सुचवले.तो उपाय काय होता, हे महत्त्वाचं नव्हतं;पण तिथून बाहेर पडताना माझं मन मात्र सुन्न झालं होतं.

गाडी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागली.चाकं वेग घेत होती,पण विचारांचं चक्र त्यापेक्षाही वेगाने फिरत होतं. खरोखरच,आकाशातल्या ग्रहांच्या स्थितीवरून माणसाचं आयुष्य ठरत असेल का? की हा केवळ मानवी भीतीचा मोठा बाजार आहे? विज्ञान सांगतं की हे विश्व अजूनही प्रसरण पावतंय, विस्तारतंय; पण माणसाचं मन मात्र दिवसागणिक आकुंचन पावत चाललंय.माणसं एकमेकांशी बोलायची थांबली आहेत. नात्यांमधला संवाद हरवलाय आणि त्यातून येणारा अबोला माणसाला इतकं एकटं पाडतोय की, त्याला व्यक्त होण्यासाठी अशा ठिकाणांचा आधार घ्यावा लागतोय.

असं नाही की माझा या गोष्टींवर पूर्णपणे अविश्वास आहे असा असता तर मी तिथे गेलोच नसतो.पण त्या गर्दीतल्या प्रत्येक चेहऱ्यावरची असहायता पाहून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली: आज माणूस भौतिकदृष्ट्या प्रगत होत असला, तरी मनान मात्र खूप 'कमकुवत' होत चालला आहे. आपण शोधतोय ते उत्तर कुंडलीत आहे की आपल्याच आत्मविश्वासात, हा प्रश्न त्या घाटावरच्या वाऱ्यासारखा माझ्या मनात घुमत राहिला. ...!

-मंगेश सुभाष सोहनी
सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर
मो.नं.९६७३९२९६७३

# महाराष्ट्रात भयानक उष्णता; कामगारांच्या कामाच्या वेळा बदलल्या; सरकारची नवी एसओपी जारी



**मुंबई ( प्रतिनिधी ):** महाराष्ट्रात उष्णतेचा कहर पहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पार ४० च्या वर गेला आहे. अनेक जिल्ह्यात तापमान ५० अंशापर्यंत जाऊ शकते असा देखील इशारा देण्यात आला आहे. तीव्र उष्णतेमुळे, सरकारने एक नवीन एसओपी जारी केली आहे. कामगारांच्या कामाच्या वेळा बदलल्या आहेत.

मुंबई ते पुणे, नागपूर ते नाशिकपर्यंत तीव्र उष्णतेची लाट पसरली आहे. बहुतांश भागांमध्ये कमाल तापमान ४० अशंपर्यंत पोहतले आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुण्यातील लोहगाव परिसर सर्वाधिक उष्ण होता, जिथे ४१.९ कमाल तापमानाची नोंद झाली. कोरेगाव पार्कमध्ये ४१.८ अंश तर शिवाजीनगरमध्ये ४०.७ अंश तापमानाची नोंद झाली. चिंचवडमध्येही तापमान ४० अंशापर्यंत पर्यंत पोहोचले. तर, विदर्भातील अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूरसह सर्वच जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली.

तीव्र उष्णता, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या लाटेचा सामना करण्यासाठी सरकारने नवीन प्रमाणित कार्यप्रणाली जारी केली आहे. या एसओपीनुसार विशेषत: बाहेर काम करणाऱ्यां कामगारांच्या कामाच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत. उन्हातान्हात काम करणाऱ्यां कर्मचाऱ्यांना हायड्रेशन ब्रेक अनिवार्य करण्यात आला आहे. सरकारच्या निर्देशानुसार, बांधकाम, लॉजिस्टिक्स अशा बाहेर काम करणाऱ्यां कर्मचाऱ्यांना पहाटे आणि संध्याकाळी काम करण्याची परवानगी देण्यात आली असून, दुपारच्या वेळी कामगारांना काम करण्यास मनाई करण्यात आली असून संबधीत व्यवस्थापनांनी याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

**कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळा बदलल्या**

उष्णतेचा तडाखा वाढत असल्याने नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामगारांच्या कामाच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत. सकाळी ६ ते ११ आणि सायंकाळी ४ ते ८ अशा वेळा निश्चित करण्यात आल्या आहेत. दुपारी १२ ते ४ या वेळेत काम करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. ही वेळ दिवसातील सर्वात उष्ण मानली जाते, जेव्हा उष्माघात आणि डिहायड्रेशनचा धोका सर्वाधिक आहे.

**हायड्रेशन आणि आरोग्याकडे लक्ष**

एसओपीनुसार सर्व कामाच्या ठिकाणी पुरेसे पिण्याचे पाणी, ओआरएस आणि इलेक्ट्रोलाइट्स उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नियमितपणे हायड्रेशन ब्रेक देणे आणि कामगारांसाठी सावलीच्या विश्रांतीच्या जागा उपलब्ध करून देणे अनिवार्य करण्यात आले आहे. कामगारांना कडक उन्हापासून दिलासा मिळावा यासाठी कीलिंग एरिया आणि तात्पुरत्या शेड उभारण्याचे निर्देश सरकारने स्थानिक प्रशासनाला दिले आहेत.

**कोणत्या क्षेत्रांतील कामगारांना हे नियम लागू होतील?**

बांधकाम, पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स, स्वच्छता सेवा, वाहतूक व्यवस्थापन आणि रस्त्यावरील विक्री यांसारख्या, जेथे कामगार थेट सूर्यप्रकाशात काम करतात, अशा सर्व क्षेत्रांना ही नियमावली लागू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**आरोग्य विभागांना सतर्कतेचे आदेश**

उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर शासकीय रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उष्माघातावरील उपचारांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली असून, रुग्णवाहिका सेवादेखील अधिक सक्षम करण्यात आली आहे. मुंबईत लागू करण्यात आलेले हे नवीन वेळापत्रक, बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# माझ्यावरील बनावट जात प्रमाणपत्राचे आरोप बिनबुडाचे: सहर शेख

**मुंबई ( प्रतिनिधी ):** ठाणे महापालिकेच्या एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांच्या बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. गेल्या काही दिवसांपासून नॉट रिचेबल असलेल्या सहर शेख यांनी माध्यमांसमोर येऊन आपली भूमिका मांडली. तसेच, सहरचे वडील युनूस शेख यांनीही आमचे कागदपत्रे खरे असून आमच्यावरील आरोप हे बिनबुडाचे असल्याचे म्हटले. तत्पूर्वी गुरुवारी अचानक मुंब्रा पोलीस ठाण्यात येऊन त्यांनी पोलिसांशी १५-२० मिनिटे चर्चा केल्यानंतर बाहेर पडताना करारा जवाब मिलेगा, दोन दिवसात आम्ही आमची भूमिका स्पष्ट करू, असेही म्हटले होते. त्यानंतर, आज सहर आणि तिच्या वडिलांनी पत्रकार परिषदेतून सविस्तर माहिती दिली.

बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणावरुन गेल्या काही दिवसांपासून गायब असलेल्या एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांनी पहिल्यांदाच माध्यमांसमोर येऊन आपली भूमिका मांडली.



मीडियाच्या माध्यमातून खोटं घराघरात पसरवण्यात आलं आहे, त्यामुळे खरं देखील पोहोचविण्याचा अधिकार आम्हाला आहे. म्हणून, आज पत्रकार परिषद घेत आहे. हे उत्तर द्यायला एवढा वेळ का? हे आम्ही ठरवणार मीडिया तुम्ही नाही ठरवू शकत? असे म्हणत सहर शेख यांनी माध्यमांनाच उलट उत्तर दिले. मीडियाच्या माध्यमातून माझ्यावर जे आरोप झाले ते बिनबुडाचे आहेत, याचा काहीही परिणाम झाला नाही. याप्रकरणात न्यायालयाने अजून निकाल दिला नाही, मग तुम्ही कसे ठरवू शकता? असा सवाल सहरने केला. तुम्ही एका ताकदवर आमदाराला हरवत आहात, अत्यंत संघर्ष करत, वडिलांना साथ देत तुम्ही निवडणूक जिंकला आहात, तर तो आनंद तुम्हाला होत असतो.

त्यामुळे, कैसे हराया... ही माझी आतमधून, मनातून आलेली स्टेटमेंट आहे. मात्र, याच गोष्टीला घेऊन बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे, असे म्हणत जात प्रमाणपत्राचे आरोप हे बिनबुडाचे असल्याचं सहर शेख यांनी स्पष्ट केलं.

**वानखेडेवरील फोटोबाबतही स्पष्टीकरण**

आमच्या गटनेत्यानं पत्रकारांना सांगितलं की, आमच्या कुटुंबातील व्यक्तीचं निधन झालं, पण दुसऱ्यां दिवशी मी वानखेडे मैदानावर दिसले असा आरोप तुमच्याकडून केला जातो. मात्र, निधन झाल्याच्या दुसऱ्यांच दिवशी मी वानखेडे मैदानावर गेले असे गटनेत्याने सांगितले का? नाही. त्यामुळेच, सगळे कन्फ्युजन पसरवले जात असल्याचेही सहर शेख यांनी सांगितले.

# कायद्यात भाषेची सक्ती नाही, गुणरत्न सदावर्तेंचा रिक्षाचालकांच्या मराठी भाषा सक्तीला विरोध

**मुंबई ( प्रतिनिधी ):** राजधानी मुंबईत मराठीसाठी शिवसेना आणि मनसे कायमच आग्रही असते, शिवसेनेत फूट पडल्यानंतरही दोन्ही शिवसेनेची मराठीसाठी तीच भूमिका पाहायला मिळते. त्यातच, मराठी लिहिता वाचता येत नसेल त्या रिक्षा टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करण्यात येणार असल्याचा मोठा निर्णय राज्याचे परिवहन मंत्री तथा शिवसेना नेते प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. विशेष म्हणजे, येत्या १ मे म्हणजेच महाराष्ट्र दिनाच्या दिवसापासून ही कारवाई केली जाणार आहे, असे आदेश देखील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. मात्र, निर्णयाला रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटना आणि संयुक्त कृती समिती अध्यक्ष शशांक राव यांनी तीव्र विरोध केला असून आता ॲड. गुणरत्न सदावर्ते हेही मैदानात उतरल्याचं दिसून येत आहे.



गुणरत्न सदावर्ते यांनी आपल्या कष्टकरी जनसंघाच्यावतीने ट्रान्सपोर्ट कमिशनर यांच्या कार्यालयात धडकी दिली. तसेच, प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करत संबंधित अधिकाऱ्यांस निवेदनही दिले. महाराष्ट्र तसेच देशभरात १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक, सामाजिक किंवा प्रशासकीय त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अशा दिवशी कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणारी कोणतीही बेकायदेशीर, संविधानविरोधी किंवा कायद्याविरोधी विधाने व कृती करणे ही गंभीर बाब आहे, असे म्हणत गुणरत्न सदावर्ते यांनी आज ट्रान्सपोर्ट आयुक्तांना रॅपिडो आणि रिक्षाचालकांच्यावतीने निवेदन दिले.

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षाचालकांना केलेल्या मराठी सक्तीचा विविध कामगार संघटनांनी स्पष्ट विरोध दर्शविला असून, भाषेच्या नावाखाली कोणत्याही नागरिकास किंवा कामगारास त्रास दिला जाणार नाही ही मूलभूत अपेक्षा व्यक्त केली आहे. भाषा हा संवादाचा विषय असून, ती दडपशाहीचे साधन बनविणे हे संविधानाच्या तत्त्वांना बाधक आहे, असे सदावर्ते यांनी म्हटलंय. ट्रान्सपोर्ट कमिशनर हे संबंधित क्षेत्रातील प्रमुख असल्याने, त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व यंत्रणांनी कोणत्याही चालकास बेकायदेशीर त्रास होणार नाही याची खात्री करणे ही त्यांची प्रशासकीय व कायदेशीर जबाबदारी आहे, असे म्हणत ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाकडे रिक्षाचालकांनी मागण्या केल्या आहेत.

**आंदोलकांच्या मागण्या काय?**

- भाषेची सक्ती करण्यासंदर्भात कोणतीही बेकायदेशीर कारवाई तात्काळ थांबविण्यात यावी.
- चालकांच्या बॅज लायसन्स संदर्भातील कोणतीही कारवाई होणार नाही याबाबत स्पष्ट आदेश जारी करावेत.
- माध्यमांमध्ये पसरत असलेल्या भ्रामक व बेकायदेशीर विधानांबाबत प्रशासनाने आपली स्पष्ट भूमिका जाहीर करावी.
- १ मे पासून कोणत्याही चालकावर अन्यायकारक किंवा बेकायदेशीर कारवाई होणार नाही याची खात्री द्यावी.

## स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या अस्थिंचे गंगेत विसर्जन

**वाराणसी :** स्वरस्वामीनी आशा भोसले यांच्या इच्छेनुसार त्यांच्या अस्थिंचे विसर्जन वाराणसी येथे पवित्र गंगा नदीत विधीवत करण्यात आले. संगीत जगतातील अद्वितीय सूर म्हणजे आशा भोसले. त्यांच्या निधनाच्या ९व्या दिवशी आज त्यांच्या अस्थिंचे विसर्जन गंगा नदीत केल्यानंतर काही व्हिडिओ समोर आले आहेत. आज वाराणसीमध्ये गंगा नदीच्या नमो घाटावरुन आशाताईंचे छायाचित्र असलेल्या फुलांनी सजवलेल्या बोटीतून त्यांच्या गाण्यांच्या मंद स्वरात अस्थि कलश मंत्रोच्चारात मणीकर्णिका घाटापर्यंत नेण्यात आला. या मुख्य बोटीच्या बाजूनं एनडिआरएफच्या जवानंच्या मानवंदना देणाऱ्यां बोटी अशा वातावरणात मणीकर्णिका घाटापर्यंत अस्थि कलश नेण्यात आला.

**गायिका आशा भोसले यांच्या अस्थिंचे झाले विसर्जन :** त्यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी विधिवत पिंडदान करुन अस्थिविसर्जन केले. यावेळी त्यांची पत्नी अनुजा आणि मुलगी जनाई भोसले यांच्यासह आशाताईंना अखेरपर्यंत साथ देणारे भाऊ राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, योगेश खडिकर, स्थानिक आमदार अवध्येश सिंह यांच्यासह जीवनगाणी मित्रपरिवारातील सदस्य या क्षणी उपस्थितीत होते.

**आशा भोसले यांचं निधन :** आशा भोसले यांचं रविवारी, १२ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात वयाच्या ९२व्या वर्षी निधन झालं. मल्टी-ऑर्गन ेल्युअरमुळं (अवयव निकामी) त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी सात दशकांहून अधिक काळ भारतीय संगीतसृष्टीवर राज्य केलं आहे. तसेच त्यांनी चित्रपटसृष्टीत हजारो गाणी गायली आहेत. याशिवाय आशाताईंबद्दल सांगायचं झालं तर. त्या १९४०च्या दशकापासून गात असून त्यांनी आपल्या आवाजावर खूप मेहनत घेतली होती. सुमारे १२ हजार गाणी गाणाऱ्यां आशा भोसले यांचं नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवलं गेलंय.

याशिवाय आशाताईंनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत हिंदीसह मराठी, बंगाली, तमिळ, गुजराती, तेलुगु, मल्याळम, कन्नड, पंजाबी अशा १४ पेक्षा जास्त भाषांमध्ये गाणी गायली आहेत. दरम्यान त्याच्या अशा अचानक निधनाची बातमी समोर आल्यावर संगीत क्षेत्रावर शोककळा पसरली होती. अनेक स्टार्सनी त्यांना सोशल मीडियाद्वारे श्रद्धांजली वाहिली होती.

# निदा खान टीसीएस मधून निलंबित, अटकपूर्व जामिनावर पुढील सुनावणी २७ एप्रिलला

**नाशिक ( प्रतिनिधी ):** कॉर्पोरेट जिहाद प्रकरणी संशयित आरोपी निदा खानला टीसीएसने सेवेतून निलंबित केले आहे. पोलीस निदाला शोधत आहे. निदाच्या घरच्यांकडे तिचा ठावठिकाणा जाणून घेण्यासाठी चौकशी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर निदाने नाशिक सत्र न्यायालयात (नाशिक सेशन्स कोर्ट) अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. निदाच्या अर्जावर सत्र न्यायालयात सोमवारी २० एप्रिल रोजी सुनावणी झाली पण निर्णय झाला नाही. पुढील सुनावणी २७ एप्रिलच्या सोमवारी होणार आहे.

न्यायालयात सुनावणी प्रलंबित असली तरी टीसीएसने निदा खानला सेवेतून निलंबित केले आहे आणि तिचे कंपनीशी संबंधित सर्व ॲक्सेस काढून घेतले आहेत. पोलिसांनी निदाचा शोध सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.सोमवारी २० एप्रिल रोजी झालेल्या सुनावणी निदाच्या वकिलाने आणि सरकारी वकिलाने आपापली बाजू मांडली तसेच युक्तिवादाचे आणखी मुद्दे मांडण्यासाठी वेळ मागितला. न्यायालयाने पुढील सुनावणी २७ एप्रिलच्या सोमवारी ठेवली आहे.

निदा खान टीसीएसमध्ये प्रोसेस असोसिएट पदावर कार्यरत होती, तिला निलंबित करताना कंपनीने टीसीएसशी संबंधित असलेले तिचे सर्व ॲक्सेस काढून घेतले आहेत. कंपनीशी संबंधित ज्या वस्तू निदाकडे आहेत त्या सर्व तिच्याकडून परत मागण्यात आल्या आहेत. तसेच तिला पुढील आदेशापर्यंत कंपनीसाठी काम करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. हा निलंबनाचा आदेश टीसीएसच्या पुणे, नाशिक, गोवा ब्रँचचे एचआर प्रमुख शेखर कांबळे यांनी काढला आहे.

टीसीएस नाशिकमधील कॉर्पोरेट जिहाद प्रकरणी आतापर्यंत नऊ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. एक गुन्हा पुरुष कर्मचाऱ्यांने तर आठ गुन्हे हे महिला कर्मचाऱ्यांनी नोंदवले आहेत. शारीरिक, मानसिक, बौद्धिक छळ तसेच विशिष्ट पदार्थ खाणे, विशिष्ट पोशाख करणे यासाठी वरिष्ठांनी दबाव टाकणे, धर्मांतराची सक्ती, अील आणि आक्षेपार्ह वर्तन, अत्याचार अशा विविध प्रकारच्या गंभीर गुन्ह्यांची नोंद टीसीएस प्रकरणी झाली आहे.

## आयुषचा खून करणाऱ्या आंदेकर आजी-मामी जेलमधून बैठकीला हजर

**पुणे ( प्रतिनिधी ):** आयुष कोमकर हत्या प्रकरणात अटकेत असलेल्या लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांनी नगरसेवक म्हणून थेट जेलमधून पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेला हजेरी लावली. महापालिकेत महिला आरक्षण आणि त्यावरून सत्ताधारी-विरोधकांमध्ये घोषणाबाजी सुरू असताना स्क्रीनवर आंदेकर झळकत होत्या. खून प्रकरणातील आरोपी आंदेकरांनी महापालिकेच्या सभेला ऑनलाइन हजेरी लावल्याची पुण्यासह राज्यभरात चर्चा होत आहे.पुणे महापालिकेची सर्वसाधारण सभा सोमवारी संपन्न झाली. या सभेला सर्वपक्षीय नगरसेवक जातीने हजर होते. याच सभेला हजर राहण्यासाठी लक्ष्मी आणि सोनाली आंदेकर यांनी न्यायालयाकडे परवानगी मागितली होती. न्यायालयाच्या परवानगीने आंदेकर सभेसाठी ऑनलाईन उपस्थित राहिल्या.जेलमधून थेट महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत आंदेकरांनी हजेरी लावल्याची चर्चा संपूर्ण शहरात होती. लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर पहिल्यांदाच त्यांनी सर्वसाधारण सभेला हजेरी लावली.पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार आणि शरद पवार यांनी ताकद लावली होती. मात्र तरीही भाजपच्या वादळासमोर राष्ट्रवादी तग धरू शकली नाही. दुसरीकडे अजित पवारांनी कारागृहात असलेल्या लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकरांना तिकीट देऊन नवा वाद ओढवून घेतला. असे असले तरी आंदेकरांनी तुरूंगात राहून महापालिका निवडणुकीत विजय मिळवला. पुणे महापालिकेची आगामी निवडणूक लढवण्याची परवानगी मागण्यासाठी बंडू आंदेकर, लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांनी न्यायालयात अर्ज केला होता. न्यायालयाच्या परवानगीनंतर लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांनी निवडणूक लढवली आणि जिंकूनही आल्या.

# ३४ आदिवासी मुली बेपत्ता! आदिवासी विकास मंत्र्यांच्या तालुक्यात खळबळ !




**यवतमाळ ( प्रतिनिधी ):** राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांचा मतदारसंघ असणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यात गत सहा महिन्यात एकूण ३४ आदिवासी मुली बेपत्ता झाल्याचा खळबळजनक आरोप भाजपानं केल्यानं खळबळ उडाली. भाजपाचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष प्रुल चव्हाण यांनी या प्रकरणात लव जिहाद असण्याची शक्यता वर्तवली आहे.

### ऑडिओ क्लिप व्हायरल

या गंभीर प्रकरणात एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली असून, या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेत आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी पोलीस प्रशासनाला चौकशीचे आदेश दिले आहेत.

### मोठं रॅकेट असल्याचा आरोप

भाजपाचे जिल्हाध्यक्ष प्रुल चव्हाण यांनी राळेगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुली बेपत्ता होत असून, गरीब पालकांना पैशांचं आमिष दाखवून मुलींना ूस लावली जात असल्याचा आरोप केला आहे. हे एक मोठं रॅकेट असून, पुणे- मुंबई- बंगळूर येथील लोक यात सहभागी असल्याचं देखील प्रुल चव्हाण यांनी सांगितलं. हे रॅकेट केवळ बालविवाह लावून देत नाही तर मुलींची मानवी तस्करी देखील करते, यामुळं पोलिसांनी या प्रकरणात कसून तपास करावा, अशी मागणी देखील प्रफुल्ल चव्हाण यांनी केली.

या प्रकरणात एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली असून, त्यामध्ये एक तरुण आणि तरुणी संवाद साधत आहेत. त्यांच्या संवादात शुभम मामा, कल्याणी आत्या आणि मजहर कुरेशी या नावाचा उल्लेख येतो. मुलींना पळवण्याकरिता बनावट आधार कार्डचा वापर केला जात असल्याची धक्कादायक चर्चा देखील राळेगाव परिसरात रंगली. कल्याणी आत्या मोबाईलवरून रॅकेट चालवते आणि बनावट आधार कार्डच्या मदतीनं मुलींना पुण्यात किंवा इतर शहरात नेते, असे देखील या संवादात पुढं आलं आहे.

### एकही तक्रार नाही

यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तालुक्यात ३४ मुली बेपत्ता झाल्याचं बोललं जात असतानाच पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी या गंभीर प्रकरणात अद्याप एकही तक्रार आलेली नाही. कोणत्याही पालकांना अद्याप आपल्या मुली बेपत्ता झाल्या, अशी तक्रार पोलिसात नोंदवली नाही, असं स्पष्ट केलं आहे.

### पोलीस अधीक्षकांची माहिती

काही संघटनांनी भरपूर मुली हरवल्या असल्याची निवेदनं दिली आहेत. मात्र, पोलीस अहवालानुसार, राळेगाव पोलीस ठाण्यात २०२५ मध्ये एकूण ३८ मुली हरवल्या होत्या. त्यापैकी एकूण ३७ मुली सापडल्या आहेत. केवळ एका मुलीचा अद्याप शोध लागलेला नाही. यासह २०२५ मध्येच एकूण १४ मुलींचे अपहरण झालं होतं. त्यापैकी १२ मुली सापडल्या असून, दोघींचा तपास सुरू आहे. २०२६ मध्ये नऊ महिला हरवल्याची तक्रार असून, त्यापैकी आठ महिला सापडल्या आहेत. एक अद्याप सापडलेली नाही," असं देखील पोलीस अधीक्षक यांनी सांगितलं.

### कायद्यानुसार गुन्हा दाखल

मजहर कुरेशी हा अल्पवयीन मुलींचे लग्न लावून देतो. यासंदर्भात माहिती समोर आली . याव्यतिरिक्त धर्मांतर संदर्भात कुठलीही माहिती पोलिसांकडे आलेली नाही.

असं असलं तरी ज्या काही तक्रारी सध्या होत आहेत, त्या संदर्भात पोलीस सखोल चौकशी करणार आहेत. ज्या काही अल्पवयीन मुलींचे लग्न लावून देण्यात आले आहेत, त्या संदर्भात आम्ही बालविवाह कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, मजहर कुरेशीसह पाच जणांना अटक केली आहे. जिल्ह्यातील अल्पवयीन मुलींचं लग्न परभणी, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, जालना आणि नागपूर अशा ठिकाणी लावून देण्यात आल्याची माहिती समोर आली असल्याचे देखील पोलीस अधीक्षकांनी सांगितले.

# मोहन भागवतांच्या 'झेड प्लस' सुरक्षेचा खर्च त्यांच्याकडूनच घ्या; सामाजिक कार्यकर्त्याची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

**नागपूर ( प्रतिनिधी ):** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पुरवण्यात येणाऱ्यां सुरक्षेचा खर्च आरएसएसकडून वसूल करण्यात यावा, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली होती. न्यायालयानं ही याचिका फेटाळून लावली. अपुऱ्यां माहितीच्याआधारे याचिका दाखल करण्यात आल्याचं निरीक्षण नोंदवत याचिका फेटाळली. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना 'झेड प्लस' श्रेणीतील सुरक्षा व्यवस्था पुरवण्यात आली आहे.

**काय आहे याचिका? :**

याचिकाकर्ते सामाजिक कार्यकर्ते ललन किशोर सिंग हे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना गैर शासकीय आहे. त्यामुळंच सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या सुरक्षेवर होणारा खर्च हा करदात्यांच्या पैशातून केला जातो, त्यामुळं सरकारी तिजोरीवर अतिरिक्त भार पडत असून संपूर्ण खर्च सरसंघचालक यांच्याकडूनच वसूल करण्यात यावा, अशा मागणी करणारी जनहित याचिका ललन किशोर सिंग यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केली होती.



**याचिकेत अपुरी माहिती :**

डॉ. मोहन भागवत यांच्या सुरक्षेवर दरमहा सव्वा कोटी रुपयांचा खर्च होतो. आरएसएस ही संस्था नोंदणीकृत संस्था नाही, त्यामुळं मोहन भागवत यांच्या सुरक्षेवरील संपूर्ण खर्च हा त्यांच्याकडूनच वसूल करण्यात यावा अशी मागणी, याचिकेत करण्यात आली होती.

उद्योगपती मुकेश अंबानी यांना पुरवण्यात आलेल्या शासकीय सुरक्षेचा खर्च त्यांच्याकडूनच वसूल करण्यात येतो, असा दाखला या याचिकेत देण्यात आला होता, अशी माहिती याचिकाकर्त्यांचे वकील अश्विन इंगोले यांनी दिली. मात्र, याचिकेत अपुरी माहिती असल्याचं सांगत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका फेटाळून लावलेली आहे.

# भरतनाट्यम् नृत्यशैलीने वेधले लक्ष; देवांगण नृत्यालय व परफॉर्मिंग आर्टस् चा नृत्यधारा 2026 वार्षिक नृत्योत्सव उत्साहात

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी




छत्रपती संभाजीनगर : नृत्य रचना महागणपती, मुरलीच्या सुरांनी सजली वृंदावनाची वाट, नटखट कान्हा खेळे गोपिका संगे, दिव्य लीला नाट्य...माखनचोर तो, तरी सगळ्यांचा लाडका, राधेच्या प्रेमात हरवलेला , भावनांचा साजिरा धागा...या बालपण ते तरुण वयापर्यंतच्या आधारित कृष्णलिलेवर सादर केलेल्या नृत्यांने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी सहभागींनी एकाहून एक असे भरतनाट्यम् प्रकारातील सादर केलेल्या नृत्यशैलीने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. यात जवळपास शंभर स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

देवांगण नृत्यालय व परफॉर्मिंग आर्टस् च्या वतीने १९ एप्रिल रोजी औरंगपुरा येथील गोविंदभाई श्रॉफ सभागृहात नृत्यधारा २०२६ हा वार्षिक नृत्योत्सव कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी शासकीय कर्करोग रुग्णालयाचे डॉ. अरविंद गायकवाड, भरतनाट्य मोहिनीयाट्टम कुचिपुडी नृत्यांगणा देवी पुथेनपुरायिल, प्रशांत बडोले, स्नेहल फाटक कळमकर, देवी मोहनदास पुतणपुरईल उपस्थित होते.

यावेळी गणपती बाप्पा-बुद्धीचे दाते, कलेचे अधिकष्ठाता या नृत्य रचना महागणपती यावर प्रांजली कौतुले, सुकेशनी मकासरे, मैथिली साबळे, पूर्वा साबळे, अविष्का तांडवे, तर गणपती पुष्पांजली यात आपल्या मनातील श्रद्धा आणि प्रेम व्यक्त करत नव्या पानसे, स्पृहा मेश्राम, स्पृहा कांबळे, कियारा सगलगिरे, मानसी बिरोटे, ईश्वरी सूर्यवंशी, शाश्वती जाधव, आराध्या कंदे, श्रेया रगडे, इशिता सेफ, यशोदा रासकर, उपासना जाधव, मेनका शहा, सृष्टी पगारे, मंगला विधाते, राखी बनकर यांनी नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तर नटेश कौतुकम् यावर सृष्टी खंदारे, श्रेया साबळे, ऋचा साळवे, कायरा गायकवाड, विशुधी मेंढे, साख्या दुधमल, तर नवरस पदम व कृष्णलिला व देवी अभिनय सरस्वती यावर राखी बनकर, सृष्टी पगारे, सुवासिनी पाटील मंगल विधाते आणि श्रीरंग विठ्ठल यावर उर्जा खरे, प्रशिखा वाघमारे, श्रावणी वाणी आणि कालीमाता यावर उर्जा खरे, तर वृंदावनी तिलालाना नृत्य श्रावणी वाणी, प्रशिखा वाघमारे, उर्जा खरे यांनी नृत्य सादर करून उपस्थितांनी मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुजा पवार यांनी केले.

पारितोषिक देवून सन्मान

सुष्टी खंदारे, श्रेया साबळे, ऋचा साळवे, कायरा गायकवाड, विशुधी मेंढे, मैथिली साबळे, साख्या दुदमल, पूर्वा साबळे, अविषका तांडवे तर ग्लोरिया सिटी : उर्जा खरे, प्रशिका वाघमारे, श्रावणी वाणी तर बेगमपुरा : नव्या पानसे, स्पृहा मेश्राम, स्पृहा कांबळे, कियारा सगलगिरे, मानसी बिरोटे, ईश्वरी सुर्यवंशी, आराध्या कंदे, श्रेया रगडे, इशिता सेफ, स्वराज धांदले, यशोदा रासकर, उपासना जाधव, शाश्वती जाधव, प्रांजली कौतुले, सुकेशनी मकासरे, मेनका शहा यांचा सन्मान डॉ. अरविंद गायकवाड,देवी मोहनदास पुतणपुरईल, स्नेहल फाटक, कळमकर, प्रशांत बडोले यांच्या हस्ते करण्यात आला.

# अग्निशमन दलाच्या शूर जवानांचा सन्मान; पदमपुरा येथे सोहळा संपन्न

## सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशा मुक्ती अभियानाचा उपक्रम

हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर | शहरातील विविध आगीच्या दुर्घटना व पूरस्थितीत जीव धोक्यात घालून नागरिकांचे प्राण वाचवणार्या अग्निशमन दलाच्या अधिकारी व कर्मचार्यांचा 'सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशा मुक्ती अभियान' तर्फेâ पदमपुरा येथील मुख्य अग्निशमन केंद्रात सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

२० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता आयोजित या कार्यक्रमात शहरातील सर्व अग्निशमन केंद्रांतील ऑन , ऑफ ड्युटीवरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन सर्व जवानांचा सत्कार करण्यात आला.

गेल्या काही काळात वैजापूर, गंगापूर, सिल्लोड, पैठण तालुक्यांतील पूरस्थितीत अडकलेल्या २०० हून अधिक नागरिक व मुक्या जनावरांची सुखरूप सुटका, जालना रोडवरील एचपी गॅस टँकर लिकेज, नारेगाव येथील गोडाऊन आग, शहागंज परिसरातील कपड्यांच्या दुकानाला लागलेली आग तसेच महावीर घर संसार या दुकानातील भीषण आगीच्या घटनांमध्ये अग्निशमन दलाने दाखवलेले धाडस, तत्परता व कर्तव्यदक्षता याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.



**याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष साजिद मौलाना म्हणाले की , 'अग्निशमन दलाचे जवान हे समाजाचे खरे रक्षक आहेत. २०२४ मध्ये जालना रोडवरील एचपी गॅस टँकर दुर्घटनेत मोठा अनर्थ टळला, तसेच नारेगाव व शहागंज परिसरातील आगीच्या घटनांमध्येही त्यांनी धाडसाने परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यांच्या या शौर्याला सलाम करण्यासाठी हा सन्मान सोहळा आयोजित केला आहे. समाजाने अशा वीर जवानांच्या पाठीशी कायम उभे राहिले पाहिजे.'**

या सर्व घटनांमध्ये अग्निशमन दलाच्या पथकातील जवानांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून मोठी जीवित व वित्तहानी टाळली. त्यांच्या या कार्याबद्दल उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात कृतज्ञता व्यक्त केली.

अग्निशमन केंद्रप्रमुख अशोक खांडेकर यांनी सांगितले की, 'अग्निशमन विभागात नुकत्याच १५ नवीन गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यामध्ये दोन हायड्रोलिक गाड्यांचा समावेश असून त्या ३६ मीटर (१०५ फूट) उंचीपर्यंत कार्य करू शकतात. शहरात एकूण ५ अग्निशमन केंद्रे कार्यरत असून मुख्य केंद्र पदमपुरा येथे आहे.

# महिला आरक्षणासाठी मतदारसंघ पुनर्रचना आवश्यक : डॉ.हुलगेश चलवादी

## विरोधकांची भूमिका 'मातृशक्ती' विरोधात

छत्रपती संभाजीनगर | रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशाचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेच्या संदर्भात मांडलेली भूमिका ही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन 'आरपीआय'चे (आ) प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले आहे.

महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी आणलेले १३१ वे घटनादुरुस्ती विधेयकाला विरोधकांनी विरोध करीत लोकसभेत पारित होऊ दिले नाही. विरोधी पक्षांकडून मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेला विरोध केला जात आहे, मात्र हा विरोध महिलांच्या सक्षमीकरणाच्या मार्गात अडथळा ठरणारा आहे. मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यानंतरच जागांची संख्या वाढेल आणि त्यातूनच महिलांना आरक्षणाची संधी मिळेल, अशा शब्दात डॉ.चलवादी यांनी ना.आठवले साहेब आणि पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

"सीमांकन विधेयकाला पारित होऊ न देणे म्हणजे प्रत्यक्षात महिलांच्या हक्कांना विरोध करण्यासारखे आहे. सूचना देण्याचा अधिकार प्रत्येकाला असला, तरी विकासात्मक आणि समावेशक धोरणांना पाठिंबा देणे ही काळाची गरज आहे, असे मत आठवले साहेबांचे असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले.

महिला आरक्षण विधेयक हे केवळ निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणलेले नव्हते, देशातील महिलांना राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याचा एक व्यापक आणि दीर्घकालीन प्रयत्न होता. त्यामुळे या प्रक्रियेला विरोध करण्याऐवजी सर्व घटकांनी सकारात्मक भूमिका घेणे अपेक्षित होते, असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले. "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महिलांच्या सन्मान आणि हक्कांसाठी कटिबद्ध असून, विरोधकांकडून होणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या वक्तव्यांचा निषेध करते," असे नमूद करीत डॉ.चलवादी यांनी देशभरात महिलांच्या अधिकारांसाठी जनजागृती आणि आवश्यक ते आंदोलन उभारण्याचा ना.आठवले साहेबांच्या निर्धाराचे समर्थन केले.

# सोयगाव नगरपंचायत अंतर्गत सुमारे 1. 25 कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन; सिल्लोडचे नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्या हस्ते संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

सोयगाव,दि.२० एप्रिल

शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत सोयगाव नगरपंचायत अंतर्गत सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन सिल्लोडचे नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले.या विकासकामांसाठी आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून जवळपास १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याअंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरी दलितेत्तर वस्ती



सुधार योजनेअंतर्गत सोयगाव येथील वार्ड क्रमांक ८, शेवळी परिसरात चिल्ड्रन पार्क उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच दयानंद नगर भागात सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम करण्यात येणार आहे.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रभाकर काळे, सिल्लोडचे उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, सय्यद नासेर हुसेन, अकिल देशमुख, शिवसेना तालुका प्रमुख धरमसिंग चव्हाण, कृउबा समितीचे संचालक दारासिंग चव्हाण, सांडू तडवी, नगराध्यक्ष आशाबी तडवी , न.प. तील शिवसेना गटनेते अक्षय काळे, नगरसेवक संतोष बोडखे, दिपक पगारे, हर्षल काळे, रऊफ शेख, भगवान जोहरे, गजानन कुडके, लतिफ शहा, संदीप सुरळकर, कदीर शहा, राजू दुतोंडे, किशोर मापारी, नारायण घनघावं, विष्णू इंगळे, गजानन कुडके, तसेच सलीमखा पठाण,मोतीराम पंडीत, विशाल चव्हाण, श्रावण जाधव, रमेश भंगी आदिंसह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

याशिवाय शहरातील बायपास रोडजवळ बसस्थानक उभारण्याचा महत्त्वाचा प्रकल्पही या अंतर्गत मंजूर करण्यात आला आहे. अल्पसंख्यांक बहुल नागरिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत गावांतर्गत सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकामाची कामेही करण्यात येणार आहेत.या कामांचे उद्घाटन नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते संपन्न झाले.

" सोयगावच्या विकासासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुरावा मुळे आज ही कामे प्रत्यक्षात येत आहेत, सुमारे १ कोटी २५ लाख रुपयांच्या या विविध विकास कामांमुळे शहरातील मूलभूत सुविधा अधिक मजबूत होतील आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. आगामी काळातही आमदार अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शन व पुढाकाराने सोयगावचा विकास अधिक वेगाने पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न राहील," असे नगराध्यक्ष अब्दुल समीर म्हणाले."

# कन्नड शहरात भव्य हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

कन्नड - दि.20 एप्रिल | शहरात रविवारी (दि. 19 एप्रिल) सायंकाळी भव्य हिंदू संमेलन व शोभायात्रा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. स्वामी समर्थ केंद्र येथून शोभायात्रेला प्रारंभ होऊन हिवरखेडा रोड, राममंदिर मार्गे पिशोर नाका व हिवरखेडा नाका परिसरातून मार्गक्रमण करत गजानन कॉलनी येथील गणपती मंदिर येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी भाजपा नेते तथा उद्योजक मनोज पवार होते. त्यांनी आपल्या भाषणातून हिंदू एकता, संस्कृती संवर्धन आणि






सामाजिक बांधिलकी यावर विचार मांडले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सर्व चैतन्य महाराज (सद्गुरु धाम आश्रम, तेलवाडी), विश्वदत्त राजगुरू महाराज व विष्णू काळे महाराज (विश्वमाई वारकरी शिक्षण संस्था, बहिरगाव) उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग बाल कार्य प्रमुख किरण खडके यांनी हिंदू समाजाशी संबंधित विविध मुद्द्यांवर भाष्य करत उपस्थितांमध्ये जागृती निर्माण केली. या संमेलनात मोठ्या संख्येने महिला, पुरुष व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. संपूर्ण परिसर भगवामय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, किशोर आबा पवार,प्रवीण अहिरे,मयूर राठोड, शशिन जाधव,संदेश पवार,नगरसेवक सुनील पवार, संदीप घोगटे , डॉ. सदाशिव पाटील, प्रमोद चौधरी, यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि मोठ्या प्रतिसादामुळे हे हिंदू संमेलन यशस्वी ठरले. संमेलनासाठी स्थानिक उद्योजक, संस्था व नागरिकांचे सहकार्य लाभले.

# मेगा जॉब फेअर 24 एप्रिल रोजी; 41 कंपन्यांचा सहभाग

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर | रोटरी परिवार छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने २४ एप्रिल रोजी भव्य मेगा जॉब फेअर आयोजित करण्यात येत आहे. संभाजीनगर व वाळूज परिसरातील सर्व रोटरी क्लबच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या जॉब फेअरमध्ये विविध क्षेत्रांतील एकूण ४१ कंपन्यांचे स्टॉल उभारले जाणार असून, त्यामध्ये लघु व मोठ्या उद्योगांसह बँकिंग, हेल्थ केअर, टेलिकम्युनिकेशन, बीपीओ, ऑटोमोबाईल, ऑफिसेस, मार्केटिंग तसेच कालिका स्टील आणि व्हेरॉक यांसारख्या कंपन्यांचा समावेश आहे. उपस्थित उमेदवारांची ठिकाणीच मुलाखत घेऊन त्यांना नोकरीची संधी दिली जाणार आहे.

या उपक्रमामुळे विविध प्रकारच्या नोकऱ्या एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून, कमी किंवा जास्त शिक्षण असलेल्या उमेदवारांनाही त्यांच्या पात्रतेनुसार संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे या जॉब फेअरमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. सुमारे अडीच हजारांहून अधिक नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या उपक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा प्रकल्प रोटरी परिवार संभाजीनगर, डॉ. सौ. इंदिराबाई पाठक महिला महाविद्यालय आणि इक्विटास डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे.

या उपक्रमासाठी प्रकल्प प्रमुख म्हणून रो. स्वाती स्मार्त कार्यरत असून, सरिता लोणीकर, विवेक कानडे, भारत चोपडे, निवृत्ती गजभारे आणि डॉ. अनिल देशमुख हे विशेष परिश्रम घेत आहेत.

या जॉब फेअरमध्ये संभाजीनगर क्लब, मेट्रो क्लब, ईस्ट क्लब, वेस्ट क्लब, सेंट्रल क्लब, कॅन्टोन्मेंट क्लब, मिड टाऊन क्लब, इलाईट क्लब, न्यू टाऊन क्लब, रेनबो क्लब तसेच वाळूज महानगर क्लब यांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

# जैतापूर अत्याचार प्रकरणात दादा महाराज अकोलकर निर्दोष

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

कन्नड : दि.20 एप्रिल - तालुक्यातील जैतापूर येथील कथित अत्याचार प्रकरणात ह.भ.प.दादा महाराज अकोलकर यांची जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्याने प्रकरणाला निर्णायक कलाटणी मिळाली आहे. बुधवारी (दि. १५ एप्रिल) रोजी न्यायालयाने हा निकाल दिला. तब्बल दीड वर्षांपासून सुरू असलेल्या या खटल्याचा अखेर शेवट झाला असून या निर्णयामुळे अकोलकर यांची समाजातील प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित होण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. जैतापूर येथे अकोलकर यांनी वारकरी संप्रदायाचे शिक्षण देण्यासाठी मुलींसाठी आश्रम सुरू केला होता. दरम्यान, २१ ऑगस्ट २०२४ रोजी प्रशिक्षणादरम्यान दोन मुलींनी त्यांच्यावर अत्याचाराचे आरोप केले होते. याप्रकरणी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात विशेष पोक्सो न्यायाधीश शौकत एस. गोरवाडे



यांच्या न्यायालयात झाली. सुमारे १८ महिन्यांच्या कालावधीत न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, साक्षीदारांचे जबाब तसेच सर्व पुरावे आणि परिस्थितीजन्य बाबींचा सखोल विचार केला. आरोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक ठोस पुरावे आढळून आले नाहीत, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अकोलकर यांना निर्दोष मुक्त करण्याचा आदेश दिला. या खटल्यात अकोलकर यांच्यातर्फे अॅड. एस. बी. सुरसे यांनी काम पाहिले.

# सोयगावात पाहिल्या बाल उद्यानाचे वार्ड क्र 8 मध्ये उद्धाटन संपन्न ; नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे यांच्या प्रयत्नांना यश

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

सोयगाव,दि.२० एप्रिल

सोयगाव शहरातील पाहिलं बाल उद्यान वार्ड क्र.आठ मध्ये मंजूर झाले असून दि.२० सोमवार रोजी सिल्लोडचे नगराध्यक्ष अब्दुल समीर अब्दुल सत्तार यांच्या हस्ते कामाचे उद्‌घाटन करण्यात आले.

सोयगाव नगरपंचायत च्या वार्ड क्र.आठ च्या नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे व माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या विशेष प्रयत्न आणि पुढाकारातुन सोयगाव शहरातील पहिले बाल उद्यान मंजूर झालेले आहे. दलितेतर वस्ती विकास योजनेतून



**आपल्या सोयगाव शहरातील लहान मुलांना खेळण्यासाठी उद्यान असायला हवं म्हणून आमच्या वार्ड क्र.आठ असलेल्या मोकळ्या जागेत बाल उद्यानसाठी पाठपुरावा करून मंजुरी मिळविली निधी उपलब्ध करून घेतला आज उदघाटन झाले लवकरच छानसं बाल उद्यान मुलांना खेळण्यासाठी तयार होईल. एक नाविन्यपूर्ण काम होत असल्यामुळे आनंद होत असल्याची प्रतिक्रिया नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे यांनी दिली.**



या कामाला सुमारे ४९ लाख रुपये निधी मंजूर झालेला आहे. आज दि.२० सोमवारी शिवसेनेचे युवा नेते सिल्लोड चे नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या हस्ते तसेच शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्‌घाटन करण्यात आले.यावेळी नगराध्यक्षा आशाबी तडवी, नगरसेविका कुसुम राजू दुतोंडे, गटनेते अक्षय काळे,नगरसेवक संतोष बोडखे,दिपक पगारे,हर्षल काळे,गजानन कुडके,भगवान जोहरे, विष्णू इंगळे, लतीफ शहा, कदिर शहा, रउफ शेख, नारायण घनघाव, किशोर मापारी, संदीप सुरडकर, तसेच कडूबा इंगळे,कैलास पिंगाळकर, महेश दुसाने,रत्नाकर सोहनी, विकास रोकडे, ह. भ.प.जितेंद्र महाराज पंडित,संतोष सोहनी,अशोक आगे, नंदू सोहनी,रमेश सोहनी,संदीप चौधरी आदिसह नागरिक उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

## चुकीची दुरुस्ती...

दि. २० एप्रिल रोजीच्या अंकात हिंदू प्रकाशवार्ताच्या प्रकाशन सोहळ्यासंदर्भातील बातमीत वृत्तपत्राविषयी एक विधान प्रकाशित झाले होते. त्यामध्ये विधान हे सुरेश जोशी यांनी म्हटल्याचे अनावधनाने प्रकाशित झालेले होते. वास्तविक सदर विधान लेखक साहित्यिक प्रशांत पवार यांनी केलेले होते.

\- व्यवस्थापक
हिंदू प्रकाश वार्ता

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-431001 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.:** MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**